**महाराष्ट्र शासन**

क्र. एमईडी-२०२०/प्र.क्र.१५३/२०/शिक्षण -१
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
९वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक :- १३ नोव्हेंबर, २०२०.

प्रति,
अध्यक्ष/ सचिव,
पुणे महानगरपालिका मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट (PMC-MET),
प्लॉट नं.९८, डॉ. नायडू हॉस्पीटल, पुणे महानगरपालिका,
संगमवाडी, शिवाजी नगर, पुणे-४११००१.

**विषय :- वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत.**
**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र. एमईडी २०१७/प्र.क्र. २१०/१७/शिक्षण-१, दिनांक २६.१०.२०१७.
२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे क्र.मआविवि/पीबी/युजी/पी-१/६०४/२०२०, दिनांक ११.११.२०२०.

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट (PMC-MET), प्लॉट नंबर ९८, डॉ. नायडू हॉस्पीटल, पुणे महानगरपालिका, संगमवाडी, शिवाजी नगर, पुणे यांचे भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मेडीकल कॉलेज अॅन्ड टिचिंग हॉस्पिटल, पीएमसी प्लॉट नंबर ९८, डॉ. नायडू हॉस्पीटल, पुणे महानगरपालिका, संगमवाडी, शिवाजी नगर, पुणे हे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावाची सक्षमता तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयानुसार आपण "छाननी शुल्क" म्हणून उक्त अभ्यासक्रमासाठी रु. १५,००,०००/- (पंधरा लक्ष फक्त) (एकरकमी-ना परतावा) इतकी रक्कम पुढे नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली भारतीय रिझर्व बँकेत/जिल्हा कोषागारात भरावी.

**०२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**
**०३- वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन**
**१०५- विषम चिकित्सा**
**(०१)(०३)- इतर जमा रकमा**
**(०२१० ०५४५)**

२. उक्त रक्कम भरल्याचा पुरावा म्हणून चलनाची मूळ प्रत शासनास आणि सत्यप्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण संशोधन, मुंबई यांना सादर करावी, तद्नंतर आपल्या संस्थेची सक्षमता तपासणी करण्यात येईल.

(डॉ. श्री.पुं.कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव,
आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे-४११००१.
प्रत उचित कार्यवाहीसाठी,

संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई
यांना याद्वारे असे निदेश देण्यात येतात की, उपरोल्लेखित सत्यप्रत प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अर्जदार संस्थेची विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने तपासणी करावी आणि तपासणीचा अहवाल शासनास आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करावा. **तसेच सदर सक्षमता तपासणी समितीमध्ये वित्त व लेखा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याचा समावेश करावा आणि कॉन्सॉरशियम वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी दिनांक १३.०५.२०१९ राजीच्या अधिसूचनेतील भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या तरतुदीनुसार स्थापन झाले आहे किंवा कसे याबाबत देखील स्वयंस्पष्ट अभिप्राय द्यावेत.**

Scanned with CamScanner